



दैनिक

अचूक वेध,अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २०६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०९ मार्च २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# घरच्या मैदानात इतिहास रचला! पुन्हा एकदा टी-२० वर्ल्ड कप जिंकला !!






**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, अहमदाबाद :** भारत आणि न्यूझीलंड यांच्यात फायनल सामना रंगला. या सामन्यात भारतीय संघाने प्रथम फलंदाजी करत २५५ धावांचा डोंगर उभारला. न्यूझीलंडला फायनल साम न्यात १५९ धावा करु शकले. भारतीय संघाने फायनल सामना ९६ धावांनी जिंकला. भारतीय संघ २०२६ चा टी-२० विश्वचषकाचा फायनल सामना जिंकला आणि चॅम्पियन बनला. फायनल सामना जिंकताच भारतीय संघाने इतिहास रचला.

**भारतीय संघाने इतिहास रचला!**

तिसऱ्यांदा ट्रॉफी जिंकणारा भारत पहिलाच देश ठरला. तर घरच्या मैदानावर टी-२० वर्ल्ड कप जिंकणारा भारत हा पहिलाच देश ठरला. सलग दोन वर्ल्ड कप जिंकणारा भारत हा पहिलाच देश ठरला. म्हणजे टी-२० विश्वचषक जिंकलाच नाही तर त्यासोबतच भारतीय संघाने इतिहास रचला.

अभिषेक शर्मा, संजू सॅमसन आणि इशान किशन यांच्या स्फोटक खेळीच्या जोरावर भारताने २५५ धावांचा मोठा आकडा उभारला आणि न्यूझीलंडसमोर विजयासाठी २५६ धावांचे लक्ष्य ठेवले. अभिषेक आणि संजू यांनी केवळ ७.१ षटकांत ९८ धावांची सलामी भागीदारी करत टीम इंडियाला चांगली सुरुवात दिली. टीम इंडियाने आयसीसी टी२० विश्वचषक फायनलच्या इतिहासातील सर्वोच्च धावसंख्या नोंदवली.

अभिषेकने २१ चेंडूत ५२ धावा, संजू सॅमसनने ४७ चेंडूत ८९ धावा आणि इशान किशनने २५ चेंडूत ५४ धावा केल्या. शेवटी दुबेने ८ चेंडूत २६ धावा केल्या. न्यूझीलंडचा कर्णधार मिशेल सँटनरने नाणेफेक जिंकली आणि भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. भारतीय संघाने सामन्यात कोणताही बदल केला नाही, तर न्यूझीलंडने एक बदल केला.

२५६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना न्यूझीलंड कधीही विजयाच्या शर्यतीत नव्हता. टिम सेफर्टच्या ५२ आणि कर्णधार मिचेल सँटनरच्या ४३ धावा वगळता, इतर कोणत्याही किवी फलंदाजाला प्रभावी खेळी करता आली नाही. या सामन्यात डॅरिल मिशेलने ११ चेंडूत १७ धावा केल्या. भारताकडून जसप्रीत बुमराहने सर्वाधिक चार बळी घेतले. अक्षर पटेलने तीन फलंदाजांना बाद केले. हार्दिक पंड्या, वरुण चक्रवर्ती आणि अभिषेक शर्मा यांनीही प्रत्येकी एक बळी घेतला.

## बळीराजाला खुश करणारा अर्थसंकल्प ; विदर्भालाही भरीव तरतूद : डॉ. अशोक जीवतोडे

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प आज (दि.६) ला मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी स्वतः मांडला. या अर्थसंकल्पात शेतकऱ्यांकरिता भरीव तरतूद करण्यात आल्याने, हा अर्थसंकल्प शेतकरी हिताचा अर्थसंकल्प ठरला असून बळीराजाला खुश करणारा अर्थसंकल्प असल्याचे भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष डॉ. अशोक जीवतोडे यांनी म्हटले आहे.

महाराष्ट्र राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना जाहीर केली आहे.

राज्यात २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजना जाहीर करण्यात आली. सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत कर्ज असलेल्या पात्र शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे. २ लाख रु. पर्यंत कर्ज माफ होईल. नियमित कर्ज फेड करणाऱ्यांना ५० हजार रुपये प्रोत्साहनपर लाभ मि ळणार आहे. कर्जमाफी योजनेसाठी समि ती गठीत करण्यात आली आहे.

**शेतकऱ्यांकरीता भरीव तरतूद**

मागेल त्याला कृषी पंप योजना, शेतकऱ्यांना दिवसा वीज मि ळेल, मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजक योजना, मुख्यमंत्री बळीराजा शेतपाणंद रस्ते योजना, बांबू विकास प्रकल्प वाढविणार, ४ कृषी विद्यापीठात एआय ची मदत, नदीजोड प्रकल्पाची कामे पूर्णत्वास आणण्यावर भर.

**विदर्भासाठी भरीव तरतूद**

गडचिरोली स्टील हब साठी २ लाख कोटी रु. ची तरतूद, तिसरी चित्रनगरी नागपूर जवळ रामटेकला होणार, नागपूर मध्ये महाराष्ट्र आरोग्य



संस्था स्थापन करणार; बल्लारपुरला टिंबर म्युझियम उभारणार.

**विकसित महाराष्ट्र २०४७ चे लक्ष असलेला अर्थसंकल्प**

महाराष्ट्र देशाचे स्टार्ट अप कॅपिटल; राज्यात ५० हजार स्टार्ट अप सुरु करण्याचे उद्दिष्ट; युनिकॉर्न मध्ये महाराष्ट्र प्रथम; महाराष्ट्र राज्य डिजिटल राज्य बनण्याचा उद्देश; परकीय गुंतवणुकीत म हाराष्ट्र अव्वल, महाराष्ट्र डिजिटल तंत्रज्ञान अभियान राबविले जाणार; राज्यात १ लाख २५ हजार उद्योजक घडविणार; महाराष्ट्र लोकसेवा आयोगातून ७५ हजार पदे भरल्या जाणार; ३६ नवदिशा केंद्र स्थापन होणार; जमिनीचे १०० टक्के व्यवहार संगणीकृत करणार; कृत्रिम बुद्धिमत्ता विभाग व सायबर सुरक्षा धोरण राबविणार; २३ हजार किलोमीटरचे नविन रस्ते, राज्य खासगी भागीदारी धोरणास मंजुरी; लाडकी बहिण योजना अबाधित राहील; मोटार वाहन करात ३०% सूट; अटल सेतू परिसरात नविन मुंबई तयार करणार इत्यादी.

याप्रकारे झालेल्या भरीव तरतुदी करीता डॉ. अशोक जीवतोडे यांनी राज्य सरकारचे अभिनंदन केले आहे.

## आखाती देशातील व्यावसायिक व प्रवासी विमान उड्डाणे नियमित प्रमाणे सुरू

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०८, मुंबई :** आखाती देशातील युद्ध सदृश्य परिस्थितीमुळे मागील काही दिवस प्रलंबित झालेली विमान सेवा व विमान उड्डाण सुरू झाली आहेत. व्यावसायिक प्रवासी विमान उड्डाणे नियमित सुरू झाल्याने भारतीय नागरिक, पर्यटक व प्रवासी भारतात येण्यासाठी आवश्यकतेनुसार थेट तिकीट आरक्षित करू शकतात, असे परराष्ट्र मंत्रालयाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

आखाती विविध देशात अडकलेल्या प्रवाशांना सहाय्य व अधिक माहितीसाठी संबंधित देशातील भारतीय दूतावास अथवा भारताच्या परराष्ट्र मंत्रालयास संपर्क साधावा, अशी माहिती महाराष्ट्र शासनाच्या राज्य आपत्तकालीन कार्य केंद्राच्या (एसईओसी) वतीने देण्यात आली आहे.

## महिला दिनानिमित्त नगरपरिषदेत महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०८, धाराशिव :** जागतिक महिला दिनानिमि त्त ८ मार्च रोजी येथील नगरपरिषदेत महिला व बालकल्याण सभापती वैशाली सुशांत सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली महिला दिनाचा कार्यक्रम पार पडला. शहरातील नगरपरिषद स्वच्छता विभागातील महिला कर्मचारी तसेच अंगणवाडी मदतनीस यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. समाजाच्या प्रगतीत महिलांचे योगदान महत्त्वाचे असून त्यांच्या कार्याचा गौरव करणे ही काळाची गरज असल्याचे मत यावेळी मान्यवरांनी व्यक्त केले.

नपच्या महिला व बालकल्याण विभागामार्फत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या निमित्ताने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उपस्थित महिलांना कुंडी सहित झाडांचे वाटप करण्यात आले. नगराध्यक्षा नेहा राहुल काकडे, महिला व बालकल्याण सभापती वैशाली सोनवणे, उपसभापती दीपा धनंजय पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला.

यावेळी नगरसेविका वैशाली रवी मुंडे, गायत्री दंडनाईक, अर्चना शिंगाडे, आकांक्षा वाघमारे, उजमासबा पठाण, रूपाली आंबेकर, शकुंतला देवकते, अलका पारवे, राणी दाजी पवार, संगीता अकुजकर, वंदना पवार तसेच जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा अस्मिता कांबळे, आहारतज्ज्ञ कल्पना सोनवणे आणि डेप्युटी डीन स्मिता गवळी यांच्या हस्ते महिलांना रोपांचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमात नगरपरिषद स्वच्छता विभागातील महिला कर्मचारी व अंगणवाडी मदतनीस यांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. आभार प्रदर्शन म हिला व बालकल्याण अधीक्षक वैशाली आव्हाड यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नगरपरिषद कर्मचारी विकास माने, स्वराज जानराव तसेच कर्मचारी वर्ग, महिला शिक्षक, महिला मुख्याध्यापक व इतर महिला कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. महिला दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमामुळे म हिलांच्या कार्याचा गौरव होत त्यांना प्रोत्साहन मिळाल्याची भावना उपस्थित महिलांनी व्यक्त केली.

## घाटात दरोड्याचा थरारक कट उधळला ! चार सराईत आरोपी ताब्यात...

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.०८, अहिल्यानगर :** मढी घाट परिसरात दरोडा टाकण्याच्या तयारीत दबा धरून बसलेल्या सराईत दरोडेखोरांच्या टोळीचा स्थानिक गुन्हे शाखेने पर्दाफाश करत चार आरोपींना ताब्यात घेतले. पोलिसांच्या धडक कारवाईमुळे संभाव्य मोठा गुन्हा घडण्यापूर्वीच उधळण्यात आल्याने परिसरात समाधान व्यक्त होत आहे.

पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या आदेशानुसार जिल्ह्यात दरोडे, घरफोडी आणि रोड रॉबरीसारख्या गुन्ह्यांना आळा घालण्यासाठी विशेष पेट्रोलिंग मोहीम सुरू आहे. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे तसेच पोलीस अंमलदार विजय पवार, बाळासाहेब नागरगोजे, सोमनाथ झांबरे, सागर ससाणे, बाळासाहेब गुंजाळ आणि चालक चंद्रकांत कुसळकर यांच्या पथकाने मढी यात्रेच्या बंदोबस्तासह



दरोडा प्रतिबंधक पेट्रोलिंग सुरू केले होते.

दरम्यान, पथकाला गुप्त बातम ीदारामार्फत माहिती मिळाली की, रेकॉर्डवरील गुन्हेगार आकाश मोहन डुकरे आणि विकास उर्फ सुनील दत्तू म्हस्के हे त्यांच्या अन्य चार ते पाच साथीदारांसह मढी ते पाथर्डी रस्त्यावरील मढी घाटात सशस्त्र दरोडा टाकण्याच्या तयारीत थांबले आहेत. माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ त्या ठिकाणी धाड टाकत सापळा रचला.

अंधाराच्या वेळी रस्त्याच्या कडेला हातात हत्यारे घेऊन संशयास्पदरीत्या उभ्या असलेल्या व्यक्तींवर पोलिसांनी अचानक कारवाई करत चार आरोपींना ताब्यात घेण्यात यश मिळवले. मात्र, इतर काही आरोपी अंधाराचा फायदा घेत घटनास्थळावरून पसार झाले.

ताब्यात घेतलेल्या आरोपींकडून पुढील चौकशी सुरू असून पसार झालेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलीस पथकांकडून विशेष मोहीम राबविण्यात येत असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

# नव्या अध्यायासाठी राज्यसभा सज्ज



आम्ही सन २०१४ किंवा २०२९ची लोकसभा संख्याबळाच्या अंगानं पाहिली नसेल तर या वर्षाअखेर राज्यसभेचे चित्र डोळ्यासमोर आणा! त्या दोन्ही लोकसभांमध्ये (सभ्य भाषेत) भक्कम असं संख्याबळ असणारा सत्तापक्ष आणि दुर्बल विरोधक असं चित्र होतं, तेच आता वरिष्ठांच्या सदनात दिसणार आहे. त्याचा निमित्त ठरतंय ती यंदाची द्वैवार्षिक निवडणूक.

भारतीय संसदीय राजकारणात २०२६ हे वर्ष राज्यसभेच्या दृष्टीनं संक्रमणाचं, पुनर्संतुलनाचं आणि नव्या नेतृत्वाच्या उदयाचं ठरणार आहे. मार्च २०२६ मध्ये ३७ सदस्य निवृत्त होत आहेत आणि जून २०२६ मध्ये आणखी २४, म्हणजेच एका वर्षात एकूण ६१ सदस्य राज्यसभेतून बाहेर पडणार आहेत. राज्यसभेच्या २४५ सदस्यीय संरचनेत हा बदल केवळ सांख्यिक नाही; तो राजकीय प्रवाहाला नव्या दिशेने वळवणारा आहे. अनुभव आणि संसदीय परंपरेमध्ये नव्या पिढीच्या आगमनाची ती वर्दी असेल. निवृत्त होणाऱ्या ६१ सदस्यांमध्ये काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, माजी पंतप्रधान एच.डी. देवगौडा, दिग्विजयसिंह, शरद पवार, अभिषेक मनू सिंघवी यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांचा समावेश आहे. यांतील शरद पवार यांच्यासह तिघे पुन्हा राज्यसभेवर येणार आहेत.

राज्यसभेचे सदस्य थेट जनतेकडून निवडले जात नसल्याने विधानसभांतील गणित निर्णायक ठरते. ज्या राज्यांत भाजप किंवा तिची सहयोगी आघाडी सत्तेत आहे, तेथे भाजपला अतिरिक्त जागा मिळवण्याची संधी होती. किमान म हाराष्ट्रापुरते तरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजप नेतृत्वाने – किंबहुना शरद पवार हेच नाव असल्याने – याबाबतीत उदार धोरण स्वीकारलं आणि महाविकास आघाडी आणखी तोळामासा होण्यापासून तूर्तास वाचली!

या निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात बिहारची सर्वाधिक चर्चा होणं स्वाभाविक आहे; कारण या राज्यातले तीन चेहरे केवळ बिहारच नव्हे, तर राष्ट्रीय राजकारणात गाजणारे आहेत. गेली काही वर्षं बिहारच्या राजकारणात स्वतःला झोकून देणारे भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे अखेर राज्यसभेवर येत आहेत. नवनियुक्त भाजप अध्यक्ष नितीन नवीन यांनाही २०१४नंतरच्या परंपरेप्रमाणे भाजप राज्यसभेवर आणत आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांनी तब्बल दोन दशकांनंतर राज्याला रामराम करून पुन्हा संसदेत प्रवेश करणं ही बाब राष्ट्रीय, विशेषतः हिंदी पट्ट्याच्या राजकारणासाठी दूरगामी पडसाद उमटवणारी ठरावी. नितीश यांनी आपले पुत्र निशांतकुमार यांना अखेर राजकारणात आणून बिहारी 'विहार' सोडला आहे! आता त्या राज्यावर भाजपची भक्कम पकड असेल आणि अमित शहा यांनी निवडणूक प्रचारात दिलेल्या आश्वासनाप्रम ाणे झालंच तर सम्राट चौधरी यांच्या पदनामाम ागचा 'उप' हटविण्याची ही उत्तम संधी असेल!

बिहारच्या पलीकडं भाजपच्या यादीकडे पाहिलं तर यावेळी, केवळ नावांची घोषणा यावरच नाही, तर त्यामागील रणनीती अधिक महत्त्वाची असल्याचं दिसतं. उमेदवार निवडताना जातीय संतुलन आणि संघटनेवरील निष्ठा याबरोबरच भाजप नवीन पिढीकडे नेतृत्वाची धुरा सोपवण्याची प्रक्रिया किती वेगाने करतो आहे हेही या संपूर्ण प्रक्रियेत दिसलं आहे. या निवडणुकीनंतर राज्यसभेत एनडीएचं बहुमत आणखी भक्कम होईल आणि आधीच अनेकदा विस्कळित भूमिका घेणारे विरोधक कमकुवत!

२०२६ मधील मार्च आणि जून या दोन्ही टप्प्यांतल्या निवडणुकांनंतर भाजपची एनडीएसह ताकद सव्वाशेचा टप्पा ओलांडून १३० सदस्य संख्येकडे जाईल. म्हणजेच महत्त्वाची विधेयक मंजूर होताना आता लोकसभेच्या तुलनेत राज्यसभेत तुलनेने शांततेचा अनुभव भाजपला येईल! दुसरीकडे काँग्रेस आणि इतर विरोधी पक्षांनी आपले वरिष्ठ आणि काही नवे प्रभावी चेहरे पुढे आणले, तर ते राज्यसभेत वैचारिक संतुलन राखू शकतील.

काँग्रेसच्या बाबतीत विरोधी पक्ष म्हणून दोन आव्हानं आहेत – वरिष्ठ नेतृत्व टिकवणे आणि नव्या नेतृत्वाला पुढे आणणे. काँग्रेसचे चार खासदार निवृत्त होत आहेत, तर पाच खासदार निवडून येणार आहेत. त्यापैकी खर्गे आणि सिंघवी हे पुन्हा येणार हे निश्चित. मात्र, दुसरीकडे ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस सदस्यांची संख्या १३वरून १७वर जाणार आहे. म्हणजे राज्यसभेत काँग्रेस आणि दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष यांच्यात जेमतेम दहा जागांचं अंतर राहील. कदाचित राज्यसभेतला परीघ आणखी अरुंद होण्याच्या शक्यतेनेच काँग्रेसवर द्रमुक नेतृत्वाला, तमि ळनाडूतून एखादी का होईना जागा द्या, अशी मागणी करण्याची वेळ आली असावी.

काँग्रेस धोरणात्मक दृष्टिकोनातून दक्षिण भारतातून, विशेषतः कर्नाटक किंवा तेलंगणमधून, एखाद्या प्रभावी नेत्याला राज्यसभेत आणण्याची शक्यता आहे. महिलांना प्रतिनिधित्व देण्याच्या दृष्टीनेही पक्ष नव नाव पुढे करू शकतो. पक्षातील बौद्धिक आणि धोरणात्मक चर्चेत सक्रिय असलेल्या व्यक्तींना राज्यसभेत स्थान देऊन आपल्या वैचारिक भूमिकेला धार देण्याची ही शक्यता दिसते. मात्र कोणतंही तिकीट मिळवण्यासाठी 'घराण्यावर निष्ठा' हा पोथीनिष्ठ दृष्टिकोन बदलल्याशिवाय आजच्या भाजपला टक्कर देणं काँग्रेससाठी अशक्य हे स्पष्ट आहे.

या सर्व राजकीय घडामोडी होत असताना नव्या संसदीय रचनेत केशरी रंगाकडे झुकणारी राज्यसभेची 'लालीमा' शांत साक्षीदाराच्या भूमिकेतच राहणार. कधीही भंग न होणाऱ्या या सभागृहातले सदस्य बदलतील, परंतु परंपरा कायम राहील. 'हाऊस ऑफ लॉर्डस'च्या धर्तीवर कायम ठेवलेला भारतीय संसदेच्या वरिष्ठ सदनाचा लाल रंग वेगळा संदेश घेऊन येतो. पंडित नेहरूंनी म्हटल्याप्रमाणे, हा रंग केवळ सजावट नसून तो त्याग, शौर्य आणि विचारांच्या तेजाचं प्रतीक आहे. नवे सदस्य त्या लाल गालिचावरून चालत येतील, तेव्हा ते एका दीर्घ संसदीय परंपरेचा भाग होतील. ज्येष्ठ नेत्यांचे ठसे त्या गालिचावर आधीच उमटलेले आहेत; त्या पद्धतीने त्यांचा सन्मान राखत पुढे जाणे ही नव्या पिढीची जबाबदारी. ६१ सदस्यांची निवृत्ती, नव्या चेहऱ्यांचा प्रवेश आणि सत्तारूढ-विरोधक यांच्यातल्या संतुलनाचा पुनर्विचार – या प्रक्रियांमुळे हे रक्तवर्णी वरिष्ठ सभागृह पुन्हा नव्या अध्यायासाठी सज्ज होईल


**– मंगेश वैशंपायन**

# स्त्री जन्मा हि तुझी कहाणी!

**'स्त्री जन्मा तुझी कहानी**
**हृदयी पान्हा नयनी पाणी'**

स्त्रीची अनेक रूपे आहेत. पूर्ण विश्वाला व्यापून राहिलेली स्त्री. अध्यात्माने स्त्रीला दिलेले अनन्य साधारण महत्त्व स्त्री म्हणजे ईश्वर व आत्मा यांचे मिलन विश्वनिर्मिती हे सर्व असुनसुद्धा स्त्री अबला ! पण आज स्त्रीच्या बाबतीत मागे वळून पाहिले तर तिची शोकांतिका समोर येते. महाभारताच्या काळापासून आजपर्यंत स्त्रीचा स्वार्थासाठी वापर केला गेला. तिच्याकडून प्रचंड अपेक्षा केल्या गेल्या. जन्माला आल्यापासून अंतापर्यंत अपेक्षा पुर्ण करता करता ती आपले अस्तित्वच विसरून गेली. मुलगी म्हणुन आई– वडील यांची अपेक्षा. पत्नी म्हणुन पती, समाज, कुटुंबातील सदस्यांची अपेक्षा. आई झाली की मुलांच्या अपेक्षा हे सर्व करतांना स्वतःच्या अस्तित्वाचा विचार तिने कधी केला? आपल्या पतीसाठी डोळ्यांवर पट्टी बांधून गांधारीने पत्नीत्व धर्म निभावला उर्मिलेचे आयुष्य लक्ष्म णाच्या प्रतिक्षेन संपले. अशा आज अनेक स्त्रिया आहेत ज्या अनिच्छेने जगतात. इतकेच नव्हे तर स्त्री सहनशील आहे अनेकांचे संसार शाबूत आहेत नाही तर पाश्चात्य म्हणून पद्धतीने सकाळी लग्न तर संध्याकाळी घटस्फोट झाला असता पण आज गरज आहे स्त्री जागृतीची, डोळसपणे जगण्याची. आपले अस्तित्व शोधण्याची. प्रथम स्त्रीने आपल्या स्त्रीत्वाचा अभिमान बाळगला पाहिजे. मुलगी जन्म ाला येणेपासून रोखू नये. यामुळे समाज संतुलन राहीलच, स्त्रीला समाजात लावणे सहज व सुरक्षित होईल.

प्रचलित समाजाने स्त्रीला शिक्षणापासून वंचित ठेवले, पण सावित्रीबाई फुले याच्या कतृत्वाने शिक्षणाची दारे खुली झाली. समाजात प्रत्येक क्षेत्रात स्वतःला पुर्णपणे झोकून देणाऱ्या स्त्रीची प्रगती दिवसेंदिवस गतीमान होऊन देशाच्या प्रमुख । पदावर स्त्री विराजमान झाली. निसर्गाने अबला बनविलेल्या स्त्रीने आपली शेतीपासून अवकाशा–पर्यंत प्रगती केली. स्त्री. पुरुषाने बरोबरीने समाजात



वावरते आहे. पण स्त्री खऱ्या अर्थाने मुक्त झाली का? स्त्रीने आज जागे व्हावे व प्रचलीत कर्मठ समाजबंधने झुगारून आपल्या स्त्रीमुक्तीचा झंझावात सुरू करावा. हे स्त्री–मुक्ती म्हणजे काय ? प्रथम जाणावे. पेंट, शर्ट घालून अवेळी घराबाहेर पडणे किंवा घरी म्हणजे स्त्रीमुक्ती नळे, शिक्षणाच्या नावाखाली गैर मार्गाने जाणे, आधुनिकतेच्या नावाखाली जुन्या वयस्क व्यक्तींचा अपमान करून कुटूंब स्वास्थ्य प्रेम बिघडवून पार्टी सभा करणे म्हणजे स्त्रीमुक्ती नव्हे. स्त्री मुक्ती म्हणजे नवीन विचार, आदर्श झोपासून पुढे जाणे. शिक्षणाबरोबर विनय संस्कार व संस्कृती यांची जोपासना करून अंधश्रद्धा झुगारून नवीन विचार स्विकारणे म्हणजे स्त्री मुक्ती समाजात स्त्रियांच्या आत्महत्येचे प्रमाण वाढत चालले आहे. ही बाब गंभीर नाही का? सम स्यांवर उपाययोजना करून त्यातून बाहेर पडण्याचे प्रयत्न केले पाहिजेत यासाठी समाज व आई–वडील यांचे सहकार्य मोलाचे ठरते.

आजची स्त्री सक्षम बनली पाहीजे. शिक्षणाने बरोबर नवीन विचारधारा होवून स्त्रीने मनाने व शरीराने सदृढ होणे आवश्यक आहे. कारण आजच्या स्त्रीला वाचविण्यासाठी कोणताही कृष्ण

कारण हे राज्य आहे अधर्माचे आज सैराटम धील आर्चीची पुनरावृत्ती होता कामा नये यासाठी गरज आहे शिक्षणाची, विज्ञानाची, तंत्रज्ञानाची कास धरून उत्तरोत्तर प्रगती करणे गरजेचे आहे. नाहीतर पुन्हा रावणाचे राज्य होईल. तिथे असेल फक्त पैशासाठी, सत्तेसाठी, व्यभिचार, अत्याचार, शोषण, या सर्वात स्त्री भरडली जाईल.

आज स्त्री सक्षम बनली पाहिजे. आज आदर्श पिढी घडवायची असेल तर त्यासाठी स्वतःपासून सुरुवात करा. समाजात जे स्वतःला जानी शिक्षित समजतात हे लोक ज्ञानाचा उपयोग पैशांसाठी करतात व जुने स्विकारतात मुळात मुलीला जन्माला घालू इच्छित नाहीत आणि जन्माला घातलेच तर तिला दुय्यम स्थान दिले जाते. परिणाम स्वरूप मुलगा भविष्यात आई– वडिलांचे प्राण घेण्यास मागे पुढे पाहत नाही, तेव्हा मुलांना दोष देऊ नका. कारण,

**'मुल म्हणजे मातीचा गोळा**
**आकार दयावा तशी मूर्ती घडते ?**

आज स्त्रीवर फार मोठी जबाबदारी आहे, उद्याचा आदर्श समाज घडवून समाजाचा –हास थांबविणे तिच्या हाती आहे. जिच्या हाती पाळण्याची दोर, ती जगाची उध्दारी, एड्स सारख्या भयानक रोगाने आज शैमान घातले आहे. मुलींनी डोळसपने समाजाकडे व जीवनाकडे पाहावे. खोट्या सुखाच्या कल्पनेत रममान होण्यापेक्षा वास्तवाचे भान ठेवून यशस्वी जगाते. लग्नाच्या वेळी पत्रिका, घराणे, संबंध पढाव्यापेक्षा मुलारी कतृत्व नितीमत्व, वैद्यकीय तपासणी यावर भर दयावा. आंधळेपणाने प्रेम न करता डोळसपणे जीवन जतंगडी शोधावा. तस्थ जीवन यशस्वी होईल. म्हणून मी असे म्हणेन.

**।। नारी नारी मत कहो,**
**नारी एक नर की शान**
**जिससे पैदाहुए है राम,**
**कृष्ण, हनुमान ।।**

**– रुपाली योगेश राऊत**
**शिरवळ**

## लहानगे

सततची काही तरी
तक्रारकरी लहानगे
कुरबुरी चालवलेली
न हो जरा मनाजोगे

काही हवे हवेचं हवे
फिरती ते मागे मागे
युक्त्याक्लृप्त्या करी
इप्सित सगळे मागे

ओरडाखातात जरा
शहाण्यांसारखे वागे
धाकात असे मोठ्यां
ना दिसते मग वावगे

बदली अंमळ वागणे
पुन्हा सांगणे रे नलगे
हट्टपेटे कधी मधूनचं
कधी तरी राग सुलगे

रुसून बसे अचानक
फुग्यांसारखे ते फुगे
निवळता परिस्थिती
मुक्तपणे विहारे फुगे

एक मिस्किल हसणे
जुळवे नात्याचे धागे
मनात कुठे क्रोध धरे
कितीही भरालं रागे

यांच्या अगदीविरुद्ध
आपण मोट्ठाले टगे
कसेही करा प्रबोधन
खुन्नस क्रोधात्म वागे

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

अक्षराज

# आजची महिला सुरक्षित आहे का ?

जागतिक महिला दिन नुकताच पार पडला. भारतात या दिवसाची विशेष क्रेझ असते. आपल्या कर्तृत्वाने नावलौकिक मिळवलेल्या स्त्रियांचा या दिवशी विविध कार्यक्रमांतून, वृत्तवाहिन्यांतून, वृत्तपत्रांतून गौरव केला गेला. महिला दिनाच्या निमित्ताने ऑनलाईन विक्रीच्या संकेतस्थळांवरसुद्धा महिलांसाठी विशेष सवलती देण्यात आल्या होत्या. अनेक कंपन्यांच्या खासगी कार्यालयांतून महिला अधिकाऱ्यांचा गौरव केला गेला. हे सर्व पाहिल्यावर एक प्रश्न पडतो कि स्त्री ही केवळ एक दिवस गौरवण्याची बाब आहे का ? या भारतभूम ीचा, येथील प्राचीन हिंदू संस्कृतीचा अभ्यास केल्यास येथे स्त्रीला नेहमीच सर्वोच्च स्थान दिले गेल्याचे लक्षात येईल. हिंदू धर्मशास्त्राने स्त्रीला शक्तिरूप मानले आहे. कोणतेही कार्य असो वा संकल्प, त्यासाठी शक्ती अनिवार्य आहे. शक्तीविना कोणताही जीव अथवा वस्तू निर्जीव स्वरूप असते. शक्तीचा सन्मान करणारी या देशात ५१ शक्तिपीठे आहेत , त्यांतील साडेतीन शक्तिपीठे आपल्या महाराष्ट्रात आहेत. सज्जनांच्या रक्षणार्थ आणि दृष्टांच्या संहारार्थ शक्तीने आपले मारक रूप वेळोवेळी प्रकट करून असुरी शक्तीचा विनाश केल्याचे आपण धार्मिक कथांतून, मालिकांतून वाचले आणि पाहिले आहे. ज्या दृष्ट शक्तींपुढे देवताही हतबल झाल्या अशांचा नाश देवींनी आपल्या अगाध सामर्थ्याने केला आहे. रामायण घडले ते माता सीतेच्या हरणामुळे, महाभारत घडले द्रौपदीच्या अपमानामुळे. स्त्रीचा सन्मान करण्याची आणि तिच्या रक्षणासाठी सर्वस्व पणाला लावण्याची शिकवण येथील संस्कृती आपल्याला देते. वीरम ाता जीजाउंनी शिवाजी महाराजांना बालपणीच शौर्याचे, अन्यायाच्या प्रतिशोधाचे, जनतेचे सर्वस्वी कल्याणाचे बाळकडू पाजले नसते, तर कदाचित या देशाला हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवराय लाभले नसते. एव्हढा गौरवशाली इतिहास ज्या भारतभूमीला लाभला आहे त्या भारतात आज स्त्रियांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर होत चालला आहे.

गेल्या काही वर्षांम ध्ये स्त्री अत्याचाराच्या घटनांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. बलात्कार, विनयभंग, अपहरण, कौटुंबिक हिंसाचाराच्या घटनांमध्ये दिवसागणिक वाढ होत आहे. ज्यामध्ये म हाराष्ट्र आघाडीवर आहे. शाळकरी मुलीच काय वृद्धाही वासनांधांच्या अत्याचारापासून वाचलेल्या नाहीत. राज्यातील प्रतिदिन होणाऱ्या स्त्री अत्याचाराच्या वाढत्या घटना मनाला अस्वस्थ करणाऱ्या आहेत. पोलीस असो, शिक्षण असो वा वैद्यकीय क्षेत्र कोणतेच क्षेत्र आज महिलांसाठी सुरक्षित राहिलेले नाही. ज्या क्षेत्रांवर महिला पूर्वी डोळे झाकून विश्वास ठेवत असत त्या क्षेत्रातही वासनांधांचा भरणा झाला आहे. चरितार्थ चालवण्यासाठी नोकरीनिमित्त घराबाहेर पडणारी स्त्री खासगी कंपन्यांतील लैगिक शोषणाला बळी पडू लागली आहे. नात्यातील मंडळींकडून केल्या जाणाऱ्या शोषणाचे प्रमाणही वाढू लागले आहे. स्त्रीच्या निर्बलतेचा फायदा घेऊन संधी साधण्यासाठी टपून बसलेल्या वासनांधांची संख्या समाजात वाढू लागली आहे. स्त्री अत्याचारविरोधी कायदे अधिक कठोर करूनही स्त्री अत्याचारांच्या घटनांमध्ये तिळमात्र घट न होता वाढच होत चालली आहे. पोलीस ठाण्यामध्ये नोंद झालेल्या गुन्ह्यांपैकी किती गुन्हे न्यायालयात तग धरतात आणि किती गुन्हेगारांना शिक्षा मिळते ? गुन्हेगारी कृत्यांना चाप बसण्यासाठी आणि गुन्ह्यांची मीमांसा करून गुन्हेगारांना दंडित करण्यासाठी देशात न्यायपालिका कार्यरत आहे; मात्र न्यायपालिकेचा रटाळ कारभार, यादरम्यान गुन्हेगारांना पुरावे नष्ट करण्यास मिळणारी मोकळीक, पोलिसांवरील राजकीय दबाव, पोलीस व्यवस्थेतील भ्रष्टाचार यांमुळे उशिरा मिळाला तरी तो न्याय असेलच याची शाश्वती नसते. महिला अत्याचारांच्या घटना रोखण्यासाठी राज्यात दामिनी आणि निर्भया पथक कार्यरत आहेत. मात्र स्त्री अत्याचाराचा वाढता आलेख पाहता त्यांना अधिक सक्षम करण्याची आज आवश्यकता आहे. बलात्कारासारख्या घटनांमध्ये गुन्हेगारांना शिक्षा मिळण्याचे प्रमाण आपल्याकडे अगदीच नगण्य आहे, परिणामी गुन्हेगारांमधील भय लुप्त होत चालले असून अशा स्वरूपाचे गुन्हे गेल्या काही वर्षांत कमालीचे वाढले आहेत. रांझेगावच्या पाटलाने एका अबला स्त्रीवर अत्याचार केल्याचे कळताच छत्रपती शिवाजी महाराजांनी त्याचे हात पाय तोडण्याचे आदेश देऊन अशा गुन्ह्यांविषयी रयतेमध्ये कायमस्वरूपी भय निर्माण केलेच शिवाय स्वराज्यातील स्त्रियांनाही सुरक्षित केले. स्त्री अत्याचारांच्या गुन्ह्यांमध्ये तत्परतेने आणि कठोर शासन केले गेले तरच गुन्हेगारांम ध्ये भय निर्माण होते, हेच या प्रसंगातून सिद्ध होते. त्यामुळे स्त्री अत्याचाराचा चढता आलेख थांबवायचा असेल तर शिक्षाही स्वराज्याप्रम ाणेच असायला हवी.

आजच्या स्त्रीपुढे कोण्या मॉडेलचा किंवा नटीचा आदर्श असून चालणार नाही. आजच्या स्त्रीपुढे आदर्श हवा आपल्या पराक्रमाने शत्रूला नामोहरम करणाऱ्या झाशीच्या राणीचा, अहील्याबाई होळकरांचा, वीरमाता जिजाऊंचा, राणी पद्मिनीचा आणि राणी चेन्नम्माचा. जेव्हा प्रत्येक स्त्री स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम होईल, तेव्हा कोणाची हिम्मत होणार नाही तिच्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची. यासाठी प्रत्येक शाळेमधून म ुलींसाठी स्वरक्षण प्रशिक्षणाचे नियमितपणे धडे दिले जावेत. येणाऱ्या प्रतिकूल प्रसंगाला कसे सामोरे जावे आणि त्याचा प्रतिकार कसा करावा याचे अद्यावत ज्ञान प्रत्येक मुलीला शालेय जीवनापासूनच दिले जावे. जेणेकरून आज नाहीतर येणाऱ्या काही वर्षांत याचे सकारात्मक परिणाम आपल्याला नक्कीच दिसतील. राज्य सरकरने यासाठी पुढाकार घेण्याची आवश्यकता असून स्वरक्षणासाठी सिद्ध होणाऱ्या मुली भविष्यात समाजातील वाढत्या स्त्री अत्याचारावर नक्कीच अंकुश आणू शकतात. ज्या दिवशी स्त्री अत्याचाराच्या आलेखला उतरती कला लागेल, ज्या दिनी स्त्रियांविषयी सन्मानाची भावना सम स्त समाजात निर्माण होईल तोच खऱ्या अर्थाने महिला दिन असेल.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## 'खाडे' विद्यालयाच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन



**अक्षराज : अनंत बोरसे**

**दि.०७, शहापूर (ठाणे) :** शहापूरच्या प्रतिथयश ग.वि. खाडे विद्यालयातील १९७८ साली दहावी च्या विद्यार्थी/ विद्यार्थीनींनी शनिवारी आपल्या शालेय जिवनातील आठवणींना ऊजाळा देत शहापूर जवळील तुलसी माऊली रिसॉर्ट येथे एकत्र जमुन स्नेहसंमेलनाचा आनंद लुटला. स्नेहसंमेलनासाठी अवि सावंत आणि मधुकर भेरे यांनी पुढाकार घेऊन अनेक मित्र मैत्रीणींना संपर्क साधला आणि दोन दिवसिय कार्यक्रमाचे नियोजन केले. शनिवारी दुपारी पुण्याहून डॉ.अभय कुलकर्णी, वासंती दाभाडकर, तसेच ठाण्याहून विद्या पातकर, प्रकाश चाचड, संजय म्हात्रे, विद्या पातकर, मेघा काबाडी, शोभा दातार, स्वप्ना अरविंदेकर,सुरेखा आंबवणे कल्याण येथुन अनिल जोशी, प्रविण देशमुख, मंगल जगे, आसनगाव वरून महेंद्र भास्कर, अनंत बोरसे असे अनेक माजी विद्यार्थी /विद्यार्थीनी सहभाग झाले होते.

शनिवारी दुपारी रिसॉर्ट वर जमल्यानंतर संध्याकाळी जवळच असलेल्या मानस मंदिर येथे जाऊन देवदर्शनाचा लाभ घेतला. रविवारी सकाळी आपण ज्या शाळांमध्ये घडलो त्या शाळेला सर्वांनी भेट दिली, काहीकाळ क्लास भरवला. डॉ. अभय कुलकर्णी यांनी शिक्षकाच्या भुमिकेत सगळ्यांचा चांगलाच 'क्लास' घेतला. यावेळी आपल्याला घडविलेल्या शिक्षकांचे स्मरण करून आठवणींना उजाळा दिला गेला. शाळा आणि शिक्षकांमुळेच आपण समाजात विविध श्रेत्रात ऊल्लेखनीय कार्य करत आहोत त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी वर्गमित्र असलेल्या प्रकाश शेणॉय याची विचारपूस करण्यासाठी आवर्जून सर्वांनी त्याची भेट घेतली.

दुपारी रिसॉर्ट वर येऊन सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला. ऐकमेकांचा निरोप घेतांना दोन वर्षांनंतर आपल्या वर्गाला ५० वर्षे पूर्ण होतील त्यानिमित्ताने पुन्हा एकदा मैत्रीचे स्नेहसंमेलन मोठ्याप्रमाणावर केले जावे आणि त्यासाठी अधिकाधिक वर्ग मित्रांना संपर्क साधला जावा असे ठरविण्यात आले. तसेच शाळेचे आपण काही देणं लागतो या भावनेने पन्नास वर्षांच्या निमित्ताने शाळेसाठी आपण काय केले पाहिजे या बाबत विचार विनिमय करण्यात आला, पुन्हा एकदा भेटण्याचे ठरवुन एकमेकांनी निरोप घेतला. असे गेटटुगेदर नित्यनेमाने व्हावे अशी भावना अनेकांनी व्यक्त केली.

## खापरखेडा येथील शिवालयात शिवजयंतीचा जल्लोष



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** खापरखेडा येथील शिवसेना सावनेर तालुका मुख्य कार्यालय शिवालयात ६ मार्च शुक्रवारला तिथीनुसार शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. दरवर्षीप्रमाणे यंदाही शिवसेनेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांना भावपूर्ण अभिवादन करण्यात आले. ढोल-ताशांचा गजर, आकर्षक विद्युत रोषणाई आणि 'जय भवानी, जय शिवाजी'च्या जयघोषाने संपूर्ण परिसर शिवमय झाला होता.

शिवजयंती उत्सवाचे औचित्य साधून शिवालय परिसराची आकर्षक फुलांनी सजावट करण्यात आली होती. सकाळी मान्यवरांच्या हस्ते महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुतळ्याला महाभिषेक करण्यात आला. त्यानंतर सामूहिक शिववंदना सादर करण्यात आली. यावेळी उपस्थित शिवप्रेमींनी दिलेल्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला होता.

शिवसेना नेते अशोक झिंगरे यांच्या पुढाकाराने आयोजित या सोहळ्याला भाजप नेते रमेश जैन, दिलीप बनसोड, राधाकिशन मित्तल, अशोक झिंगरे, सुरेंद्र कच्छावे, बबलू ठाकूर, सचिन गजभिये, अशोक वंजाळ, दिलीप गजभिये, सुधीर फेंडर, सुरेश पौनिकर, राजू बोरकर, बलदेव श्रीवास्तव, सुरेश केने, नरेंद्र मोरे, दिनेश गुडघे, जयंत झिंगरे, विकास बारई, बबलू मित्तल, चौधरी यांच्यासह विविध राजकीय पक्षाचे नेते व सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्थानिक कार्यकर्त्यांनी हा सोहळा यशस्वी करण्यासाठी अथक परिश्रम घेतले. राजकीय मतभेद विसरून सर्वपक्षीय पदाधिकारी आणि नागरिक एकत्र आल्याने अण्णामोड परिसरात सामाजिक एकोप्याचे दर्शन घडले.

> हिंदवी स्वराज्याचे संस्थापक राजे छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार आणि त्यांचा पराक्रम आपल्याला प्रेरणा देणारा आहे. हा वारसा पुढच्या पिढी पर्यंत पोहचविण्यासाठी शिवजयंती सारखे उत्सव महत्वाचे आहे.
>
> **– अशोक झिंगरे, शिवसेना नेते**

## २८८ वा किल्ला विजयीऊत्सव साजरा !

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०८, मिरा भाईंदर :** जंजिरे धारावी किल्ला संवर्धन कमिटी ने दिनांक ६.०३.२०२६ रोजी मिरा भाईंदर ची महापौर डिंपल मेहता व स्टँडिन कमिटी अध्यक्ष हसमुख गेहलोत, अनेक स्थानिक नगरसेवक, काँग्रेस चे गट नेता जय ठाकूर आणि महाराष्ट्र राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईकव इतर मान्यवरांच्या उपस्थित २८८ वा विजयमहोत्सव साजरा झाला. या कार्यक्रमात किल्ला संवर्धन कमिटी चे अध्यक्ष श्रेयस सावंत, व कार्यकरणी रोहित सुवर्णा, मयूर ठाकूर ह्यांनी पाहुण्याची शाल आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. जंजिरे धारावी किल्लाचे सुशोभिकरण करण्यासाठी शासना कडून मदत आणण्यासाठी प्रयत्न करीन असे आश्वासन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक ने संवर्धन कमिटी ला दिले.घोडबंदर किल्ला प्रमाणे हा ही किल्ला मिरा भाईंदर चे अभिमान असेल.

- मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या वतीने अधिक भव्य प्रमाणात कार्यक्रम करावा अशी इच्छा व्यक्त केली.
- मिरा भाईंदर नागरिकानी ही उत्सवात भाग घेतला पाहिजे.
- किल्ला जतन व संवर्धन कमिटी किल्ल्याच्या विकासा साठी नेहमीच तत्पर असणार - मयूर ठाकूर.
- किल्ला साठी माजी आमदार गीता जैन व माजी खासदार राजन विचारे ने महाराष्ट्र शासनानाकडून एकंदरीत १० करोड आणले होते पण प्रशासन उदासीनते मुळे ते परत गेले.-रोहित सुवर्णा ने माहिती दिली व नाराजी व्यक्त केली.

## रस्त्याच्या निकृष्ट कामाविरोधात महाबळेश्वर-पाचगणीत कडकडीत बंद; आंदोलनाचा इशारा

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०८, महाबळेश्वर (सातारा) :** सुरूर ते महाबळेश्वर या मुख्य रस्त्याचे काम अत्यंत संथ गतीने आणि निकृष्ट दर्जाचे सुरू असल्याच्या निषेधार्थ, 'आम्ही महाबळेश्वरकर' च्या वतीने पुकारलेल्या बंदला महाबळेश्वर आणि पाचगणी शहरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. दोन्ही शहरांतील बाजारपेठा आणि व्यवहार कडकडीत बंद राहिले. या आंदोलनामुळे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले असून, आगामी काळात हे आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा स्थानिकांनी दिला आहे.



**निकृष्ट दर्जाचे रस्त्यामुळे पर्यटक आणि स्थानिकांचे हाल...**

सुरूर-महाबळेश्वर रस्त्याच्या रखडलेल्या कामामुळे वाई, पाचगणी आणि महाबळेश्वरमधील नागरिक तसेच पर्यटकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. निकृष्ट दर्जाच्या कामामुळे अपघातांचा धोका वाढला असून धुळीचाही त्रास होत आहे. या पार्श्वभूमीवर महाबळेश्वर येथे विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी बाजारपेठेत फेरफटका मारून बंदची पाहणी केली. यावेळी माजी नगराध्यक्ष डी एम बावळेकर, राजेश कुंमारदरे, नगरसेवक रवींद्र कुंभारदरे, रमेश पल्लोड, विजय नायडू, महेश गुजर, राजेंद्र बावळेकर, राजेंद्र पवार, उषाताई ओंबळे, गोविंद कदम, शंकर ढेबे, इरफान कुरेशी, प्रमोद शेटे, अशोक शिंदे, नाना कदम, गिरीश नायडू, राजेंद्र पंडित, अनिल लोहार, रियाज भाई डांगे, बैतुलहा शेख, अंकित पल्लोड, तसेच महाबळेश्वर नागरिक व व्यापारी वर्ग उपस्थित होते.

**माजी नगराध्यक्ष डी. एम. बावळेकर म्हणाले,** शासनाने आणि प्रशासनाने या रस्त्याच्या कामाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले आहे. रस्त्यासाठी निधीची तरतूद असूनही काम संथ गतीने सुरू आहे. प्रशासनाला जाग आली नाही, तर भविष्यात 'रस्ता रोको'सह विधानभवनावर धडक मोर्चा काढण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

महाबळेश्वरचे अर्थकारण पर्यटनावर अवलंबून असूनही व्यापाऱ्यांनी १००% बंद पाळून आपला निषेध नोंदवला आहे. केवळ महाबळेश्वर-पाचगणीच नव्हे, तर आता वाई शहरही दोन दिवसांनी बंद ठेवण्याचा निर्णय स्थानिक नागरिकांनी घेतला आहे. सुरुर महाबळेश्वर रस्त्याचे काम वेळेत पूर्ण झाल्यास न झाल्यास आंदोलनाची दिशा लवकरच ठरविण्यात येईल अशा तीव्र भावना दि.अर्बन बँकेचे संचालक राजेश कुंभारदरे यांनी व्यक्त केल्या.

**शिवसेनेचे शहर प्रमुख विजय नायडू आपल्या भावना व्यक्त करताना म्हणाले,**

सुरूर, महाबळेश्वर, पाचगणी रस्ता लवकरात लवकर पूर्ण होणे गरजेचे आहे. जर प्रशासनाने या बंदची दखल घेतली नाही, तर संपूर्ण तालुक्यात यापेक्षाही तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशाराही त्यांनी दिला.

या वेळी नगरसेवक रविंद्र कुंभारदरे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना या पुढे दखल न घेतल्यास आंदोलन तिव्र करण्यात येईल असा इशारा दिला.

महाबळेश्वर आणि पाचगणीच्या यशस्वी बंदनंतर आता या आंदोलनाची धग वाई शहरात पोहोचणार आहे. येत्या काही दिवसांत वाई शहरही बंद ठेवण्यात येणार असून, निकृष्ट काम करणाऱ्या ठेकेदारावर आणि संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

## टिव्ही जर्नालिस्ट असोसिएशन आणि आरबीजी फॉउंडेशन यांच्या वतीने दोन रुग्ण वाहिकांचे लालबागचा राजा मंडळास हस्तांतरण...

**अक्षराज : सुनिल साखरकर**

**दि.०८, मुंबई :** टिव्ही जर्नालिस्ट असोसिएशन आणि आर.बी.जी. फॉउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवार दि. ६ मार्च २०२६ रोजी संकष्टी चतुर्थी तसेच छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या शुभ दिनाचे औचित्य साधून लालबागचा राजा मंडळास जनतेच्या आरोग्याची आपत्कालीन सेवा करण्यासाठी दोन रुग्णवाहिकेचे हस्तांतरण करण्यात आले.

लालबागचा राजा मंडळाचे असिमीत कार्य पाहता ही सेवा टि व्ही जर्नालिस्ट असोसिएशन आणि आर.बी.जी. फॉउंडेशन यांच्या वतीने बहाल करण्यात आली.



या कार्यक्रमासाठी सुधीर साळवी (सचिव, लालबागचा राजा मंडळ तथा शिवसेना -उबाठा गट), राजेंद्र लांजवळ (समाज सेवक), बाळासाहेब कांबळे (अध्यक्ष, लालबागचा राजा) मंगेश दळवी (कोषाध्यक्ष) तसेच संपूर्ण कार्यकारिणी सदस्य, त्याचप्रमाणे उदय जाधव (पत्रकार), मनश्री माटम, पंकज दळवी, प्रविण पाटील, ह्यांची उपस्थिती होती.

ही सेवा सर्व रुग्णांसाठी मोफत असून सर्वांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन लालबागच्या राजा मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## दापोलीत आरोग्य सेविकेला मारहाण ! आरोपी विरोधात गुन्हा दाखल

**अक्षराज : कृष्णा श्रावणपाटील**

**दि.०८, दापोली (रत्नागिरी) :** आरोग्यसेविका जयश्री पांढरे व त्यांच्या पतीला मारहाण केल्याप्रकरणी दापोली पोलीस ठाण्यात ४ जणांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली आहे.



याबाबत दापोली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार (दि.६) रोजी सायंकाळी ६.१५ चे सुमारास संख्या कोळेकर यांच्या थार वाहनाच्या पाठीमागील कोपर्याला पांढरे यांची दुचाकी घासल्याने त्यासंदर्भात संख्या कोळेकर यांना भेटायला पांढरे दाम्पत्य गेले होते.

मात्र चर्चा सुरु असताना त्यांच्यात भांडण झाले त्यामुळे पांढरे दाम्पत्य दापोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी त्यांच्या दुचाकीने येत असताना त्यांच्या मागून बुलेटवरून संख्या कोळेकर व त्यांचे पती आले. दापोली न्यायालयासामोर असलेल्या सती मंदिरासमोर त्यांनी पांढरे यांच्या दुचाकीला लाथ मारली त्यामुळे पांढरे दाम्पत्य खाली पडले. त्यानंतर,संख्या कोळेकर व त्यांचे पती ओमकार कोळेकर यांनी पांढरे दाम्पत्य याना शिवीगाळ केली व मारहाण करण्यास सुरुवात केली. संख्या पवार यांचे भाउ व एक महिलाहि तेथे आले व त्यांनीही पांढरे दाम्पत्याला मारहाण करण्यास सुरुवात केली. काळ्या रंगाचा चाकू जयश्री पांढरे यांच्या मानेवर लावून गळा कापून ठार मारण्याची धमकी दिली. मनाला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तनही केल्याची तक्रार जयश्री पांढरे यांनी दापोली पोलीस ठाण्यात दाखल केली आहे. या तक्रारीनुसार ४ संशयितांवर भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७४, ११५(२), ३५१(२), ३५२, ३(५), ११८(१) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास उपनिरीक्षक ज्योती चव्हाण करत आहेत.

याच प्रकरणात संख्या कोळेकर यांनीही जयश्री पांढरे, अनिल पांढरे व अनिल पांढरे यांचा भाऊ यांच्याविरोधात दापोली पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

या तक्रारीत म्हटले आहे कि, हे तीन जण आमच्या जिममध्ये आले व त्यांनी मला व पतीला शिवीगाळ केली. त्यांचे सोबत चर्चा करत असताना ते दुचाकीने पळून गेले. म्हणून आम्हीही त्यांच्या मागून जात असताना त्यांनी त्याची दुचाकी आपल्या दुचाकीच्या डाव्या बाजूला दाबली. यात कोळेकर पती पत्नी दुचाकीवरून खाली पडले. त्यानंतर अनिल पांढरे यांनी संख्या कोळेकर यांचे केस धरून त्यांना मागे ओढले. त्यांच्या मनाला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले. त्यानंतर ३ जणांनी आपल्याला मारहाण केली असल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

या तक्रारीनुसार आरोपी यांचे विरोधात ७४, ११५(२), ३५१(२), ३५२ ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास उपनिरीक्षक ज्योती चव्हाण करत आहेत.

## आदर्श जि.प.मराठी उच्च प्राथमिक शाळा बोराखेडीला शाळा व्यवस्थापन समितीची भेट

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, मोताळा (बुलढाणा) :** मोताळा तालुक्यातील बहुआयामी व्यक्तिमत्व मुख्याध्यापक चव्हाण सर यांच्या मार्गदर्शनात नावारूपास आलेल्या राज्य शासनाने मॉडेल स्कूल म्हणून घोषित केलेल्या तालुका जिल्हा व विभागातून विविध प्रथम क्रमांकाची बक्षिसे मिळवलेल्या आदर्श जिल्हा परिषद मराठी प्राथमिक शाळा बोराखेडी तालुका मोताळा जिल्हा बुलढाणा या शाळेला पिंप्रीगवळी तालुका मोताळा जिल्हा बुलढाणा येथील नवीनच पुनर्गठीत शाळा व्यवस्थापन समितीच्या पदाधिकाऱ्यांनी अभ्यासपूर्ण भेट दिली.

काही चांगले उपक्रम समजून घेऊन आपल्या शाळेतही तसे उपक्रम राबवावे अशा चांगल्या उद्देशाने मुख्याध्यापक सरोदे सर यांच्या मार्गदर्शनात या अभ्यास दोऱ्याचे आयोजन करण्यात आले होते.

या शाळेतील खालील वैशिष्ट्यपूर्ण बाबींचा अभ्यास करण्यात आला.




पूर्व प्राथमिक वर्ग (KG1, KG2), सेंद्रिय परसबाग, विद्यार्थी बचत बँक, वैशिष्ट्यपूर्ण वर्ग सजावट, कॅम्पुटर लॅब, सुसज्ज वाचनालय, कार्यानुभव कक्ष, कलादालन, संगीत कक्ष, गणित प्रयोगशाळा, ब्रेन जिम

अशा अनेक वैशिष्ट्यपूर्ण बाबींचा अभ्यास करून आपल्या शाळेत त्या राबवण्याचा समितीने संकल्प केला.

या नंतर सर्वानी मोताळा तालुक्याचे नवनियुक्त प्रभारी गटशिक्षणाधिकारी डी.डी.पाटील साहेब यांची त्यांच्या कार्यालयात जाऊन भेट घेतली. त्यांच्याशी शाळेच्या विविध समस्या बाबत चर्चा केली. साहेबांनी त्यांच्या समस्या ऐकून घेऊन त्या सोडवण्याचे व लवकरच कायमस्वरूपी शिक्षक देण्याचे आश्वासन दिले.

तसेच नव पुनर्गठित शाळा व्यवस्थापन समितीचे काय अधिकार आहेत. त्यांची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या काय आहेत. याबाबत सखोल मार्गदर्शन (प्रशिक्षण म्हटले तरी वावगे होणार नाही) केले. केव्हाही अडचण आली तर मला फोन करा मी आपल्यासाठी सदैव तयार आहे असे साहेबांनी आश्वासन दिले.

अभ्यसदौ अभ्यास दौऱ्यात अध्यक्ष अजय खराटे, उपाध्यक्ष रेणुका क्षिरसागर, सुजित सिरसाठ, गणेश लहासे, शारदा खराटे, प्रदिप सुरळकर, वैशाली मुंदोकार, सौ.पांडव, रोशन शहा, संजय पवार, सरोदे सर यांनी सहभाग घेतला.

# ७१ फूट भव्य श्रीराम मूर्तीसमोर काशीच्या धर्तीवर महाआरती

## नाशिकच्या तपोवनात अवतरली 'अयोध्या'

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०८, विंचूर (नाशिक) :** नाशिकच्या ऐतिहासिक तपोवन परिसरात प्रभू श्रीरामाची महाराष्ट्रातील सर्वात उंच, ७१ फुटी भव्य प्रतिमा (मूर्ती) श्री राम कपिला संगम आरती समिती ट्रस्ट तपोवन पंचवटी, नाशिक. यांच्या संयुक्त विद्यमाने साकारण्यात आली असून, सध्या हे स्थान भाविकांच्या श्रद्धेचे मुख्य केंद्र बनले आहे.



विशेष म्हणजे, दररोज सायंकाळी या ठिकाणी उत्तर प्रदेशातील काशीच्या धर्तीवर अत्यंत मंगलमय वातावरणात महाआरती संपन्न होत आहे.भव्य मूर्ती महाराष्ट्रातील प्रभू श्रीरामाची ही सर्वात उंच (७१ फूट) मूर्ती असून तपोवनाच्या वैभवात यामुळे मोठी भर पडली आहे. रोज सायंकाळी ६:३० वाजता प्रभू श्रीराम आणि श्री गंगा मातेची महाआरती केली जाते. काशी येथील परंपरेप्रमाणेच येथे पुजारी आणि सपत्नीक जोडप्यांच्या हस्ते विधीवत पूजन केले जाते. श्रीराम नवमीचा भव्य उत्सव येत्या श्रीराम नवमीला आयोजकांकडून दोन दिवसीय भव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. यात मोठ्या प्रमाणावर धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे.

नुकत्याच झालेल्या महाआरती प्रसंगी पत्रकार सुनील क्षिरसागर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहून यांनी आरतीचा लाभ घेतला. यावेळी आयोजकांच्या वतीने सर्व मान्यवरांना प्रभू श्रीरामाचा मानाचा 'शेला' घालुन विशेष सन्मान करण्यात आला.

या उपक्रमामुळे नाशिकमध्ये पुन्हा एकदा भक्तीचा मळा फुलला असून, श्रीराम नवमीच्या सोहळ्यासाठी नाशिककर उत्सुक आहेत.

यावेळी श्री राम कपिला संगम आरती समिती ट्रस्ट तपोवन पंचवटी, नाशिक अध्यक्ष महंत डॉ.भक्तीचरन महाराज, उपाध्यक्ष दीपक बैरागी, कार्याध्यक्ष भगवंत कोठुळे, समिती प्रमुख नागेश चव्हाण, रोहित कोठुळे, योगेश बर्वे, निशिकांत पगारे, अश्विन पेखले, महंत बैजनाथ महाराज आयोजक श्रीराम कपिला आरती संगम समिती.

# मंद्रूप पोलीस स्टेशनच्या आवारात पक्षी-जलपात्र बांधण्याचा स्तुत्य उपक्रम

**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.०८, सोलापूर :** उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे पाण्याअभावी त्रस्त होणाऱ्या पक्ष्यांना दिलासा मिळावा. या उद्देशाने मंद्रूप पोलीस स्टेशनच्या आवारात पक्षी-जलपात्र बांधण्याचा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे उद्घाटन सोलापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी संकेत देवळेकर यांच्या हस्ते करण्यात आले. पोलीस पाटील प्रविण राठोड यांच्या पुढाकारातून पोलीस स्टेशन परिसरातील अनेक झाडांवर पक्ष्यांसाठी जलपात्रे बांधण्यात आली.

यावेळी बोलताना संकेत देवळेकर यांनी संत तुकाराम महाराजांच्या वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या अभंगातील ओळीचा उल्लेख करत निसर्गाशी असलेले मानवी नाते अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, निसर्गातील वृक्ष, वेली, पक्षी आणि प्राणी हे आपल्या जीवनाशी अतूट नात्याने जोडलेले आहेत. झाडे माणसाला सावली, फळे, औषधे आणि लाकूड देतात तसेच वातावरणातील प्रदूषण कमी करण्यास मदत करतात. जंगलातील पक्षी व प्राणी पर्यावरणातील नैसर्गिक समतोल राखण्याचे महत्त्वाचे कार्य करतात. त्यामुळे निसर्गातील प्रत्येक घटक आपल्यासाठी उपयुक्त असून तो आपल्या कुटुंबातील सदस्याप्रमाणेच आहे, अशी भावना प्रत्येकाने जोपासली पाहिजे.

आजच्या काळात जंगलतोड, वाढते प्रदूषण आणि हवामान बदल यामुळे पर्यावरण गंभीर संकटात सापडले आहे. त्यामुळे निसर्गाचे संवर्धन करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे. निसर्गाला आपले नातेवाईक समजून त्याचे जतन करणे ही काळाची गरज आहे. झाडे लावा, त्यांची काळजी घ्या आणि पक्षी-प्राण्यांवर प्रेम करा. निसर्ग वाचला तरच आपले जीवन सुरक्षित राहील, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. पोलीस पाटील प्रविण राठोड हे पक्ष्यांसाठी जलपात्रे उभारण्यासारखे सामाजिक आणि पर्यावरण पूरक उपक्रम राबवून निसर्गाचा समतोल




राखण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असल्याचे सांगत संकेत देवळेकर यांनी त्यांच्या कार्याचे कौतुक केले. समाजातील प्रत्येकाने अशा उपक्रमांत सहभाग घेत पर्यावरण संवर्धनासाठी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले. या प्रसंगी मंद्रूप पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक शंकर पटवारी, पीएसआय राजू डांगे, पक्षीमित्र प्रविण राठोड, पोलीस कर्मचारी तसेच मंद्रूप पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व पोलीस पाटील उपस्थित होते.

# डोंबिवलीत जागतिक महिला दिनी नारीशक्तीचा डंका

## तब्बल ९ हजार १११ रणरागिणींनी लेझिम गजर करीत रचला विश्व विक्रम

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.०८, डोंबिवली (ठाणे) :** आंतरराष्ट्रीय महिला दिनाचे औचित्य साधून डोंबिवली आणि कल्याण परिसरातील सत्तरहून अधिक शाळांमधील तब्बल ९ हजार १११ विद्यार्थिनींनी रविवार, दिनांक ०८ मार्च २०२६ रोजी सकाळी डोंबिवलीतील एमआयडीसी मधील सावळाराम महाराज क्रीडा संकुलातील मैदानावर सामूहिक लेझिम वादन करून विश्व विक्रमाची नोंद केली आहे.



डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवार आणि कल्याण तालुका शारीरिक शिक्षण विभागाने या दिमाखदार कार्यक्रमाचे संयुक्तपणे आयोजन केले होते.वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्याने या गीताच्या माध्यमातून राष्ट्र भक्तीचा जागर करण्यासाठी या वेळच्या डोंबिवलीतील श्री गणेश मंदिर संस्थांतर्फे काढण्यात येणाऱ्या गावकीच्या गुढी पाडवा नववर्ष स्वागत यात्रेत वंदे मातरमचा जयघोष करण्यात येणार आहे. आत्तापर्यंत स्वागतयात्रा म्हटले की, ज्येष्ठ नागरिक, जाणकार आणि अनुभवी व्यक्तींचा पुढाकार आणि त्यांच्याच माध्यमातून निघणारी स्वागत यात्रा ही चित्र खोडून तथा पुसून टाकण्यासाठी यावेळी स्वागत यात्रेचे पूर्ण नियोजन २० ते ३० वयो गटातील तरुणांच्या गटसमूहाने केलेले आहे. नववर्ष स्वागत यात्रेची माहिती डोंबिवलीच्या श्री गणेश मंदिरात आयोजित कार्यक्रमात देण्यात आली.

यावेळी मंदिराच्या अध्यक्षा अलका मुतालिक, स्वागत यात्रेचे प्रमुख संयोजक अमेय काटदरे, मंदिराचे विश्वस्त उपमहापौर राहुल दामले, प्रवीण दुधे, श्रीपाद कुलकर्णी, नगरसेवक मंदार हळबे, सनदी लेखापाल सुहास आंबेकर, गौरी खुंटे आणि राजय कानिटकर उपस्थित होते.

डोंबिवली – वंदेमातरम गीताला १५० वर्ष पूर्ण झाल्याने या गीताच्या माध्यमातून राष्ट्रभक्तीचा जागर करण्यासाठी यावेळच्या डोंबिवलीतील श्री गणेश मंदिर संस्थानतर्फे काढण्यात येणाऱ्या गावकीच्या नववर्ष स्वागत यात्रेत वंदेमातरमतचा जयघोष करण्यात येणार आहे. आतापर्यंत स्वागत यात्रा म्हटली की ज्येष्ठ, जाणते यांचा पुढाकार आणि त्यांच्या माध्यमातून निघणारी स्वागत यात्रा हे चित्र खोडून काढण्यासाठी यावेळी स्वागत यात्रेचे पूर्ण नियोजन २० ते ३० वयोगटातील तरूणांच्या गट समूहाने केले आहे.नववर्ष स्वागत यात्रेची माहिती श्री गणेश मंदिरात आयोजित कार्यक्रमात देण्यात आली.

यावेळी मंदिराच्या अध्यक्षा अलका मुतालिक, स्वागत यात्रेचे प्रमुख संयोजक अमेय काटदरे, मंदिराचे विश्वस्त उपमहापौर राहुल दामले, प्रवीण दुधे, श्रीपाद कुळकर्णी, नगरसेवक मंदार हळबे, सनदी लेखापाल सुहास अंबेकर, गौरी खुंटे, राजय कानिटकर उपस्थित होते.वंदेमातरम हे शीर्षक घेऊन यावेळची नववर्ष स्वागत यात्रा काढण्यात येणार आहे. स्वागत यात्रेवर श्री गणेश मंदिरापासून ते रस्तोरस्तीच्या रांगोळ्या, स्वागत यात्रेतील चित्ररथ, सहभागी संस्था, संघटनांचे सदस्य, पदाधिकारी यांच्या हातामधील फलक यावर राष्ट्रभक्तीची छाप असणार आहे.

संस्कार भारतीतर्फे श्री गणेश मंदिर संस्थानातील आवार, बापूसाहेब फडके रस्ता, स्वागत यात्रेच्या मार्गावर रांगोळ्या काढण्यात येणार आहेत. या रांगोळ्या स्वातंत्र्य युध्दातील क्रांतिकारकांची व्यक्तिचित्रे, देश घडणीतील राष्ट्रपुरुष यांच्या असणार आहेत.

स्वागत यात्रेत ज्येष्ठ, जाणत्यांचा सहभाग असला तरी स्वागत यात्रेचे पूर्ण नियोजन यावेळी तरूणांचा गट समूह करणार आहे.

माहिती तंत्रज्ञान, विविध प्रकारचे कौशल्ये असलेल्या, उच्चशिक्षित नवतरूण पीढीने आपल्या सांस्कृतिक सण, उत्सवांच्या परंपरा पुढे नेण्यासाठी सामाजिक सेवेचा भाग म्हणून पुढाकार घ्यावा या उद्देशातून यावेळचे स्वागत यात्रेचे नेतृत्व विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या नवतरूणांकडे देण्यात आले आहे, असे विश्वस्त प्रवीण दुधे यांनी सांगितलेनववर्ष स्वागत यात्रेत सहभागी होण्यासाठी चित्ररथच पाहिजे हा संस्था, संघटनांच्या मनातील भ्रम यावेळी दूर करण्यात आला. स्वागत यात्रेत सहभागी होण्यासाठी सद्यपरिस्थितीचा विचार करता चित्ररथाचा आग्रह धरण्यात आला नाही. फक्त संबंधित संस्था, संघटनांच्या सदस्यांनी गटसमुहाने स्वागत यात्रेतील शीर्षक विचारात घेऊन सहभागी व्हावे असे सूचविण्यात आले आहे. यावेळी स्वागत यात्रेत राष्ट्रभक्तीचा जागर करणारे १५ चित्ररथ असणार आहेत.

स्वागत यात्रेनिमित्त आयोजित गायन, वादन, नृत्य स्पर्धांमध्ये इयत्ता पाचवी ते आठवीचे विद्यार्थी सहभागी होणार आहेत.डोंबिवली शहर परिसरातील ३९ हून अधिक शाळांमधील विद्यार्थ्यांचा पाच दिवस चालणाऱ्या उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग असणार आहे. अधिकाधिक शालेय, तरुण गटाने स्वागत यात्रेचे नेतृत्व करावे हाही यामागील उद्देश आहे.

ढोल, ताशा, झांज, लेझिम पथके यात्रेत सहभागी असतील. सकाळी ७ वाजता स्वागत यात्रेला डोंबिवली पश्चिमेतील भागशाळा मैदान येथून सुरूवात होईल. सकाळी साडे दहा वाजता आप्पा दातार चौकात यात्रेचा समारोप होईल, असे संयोजक काटदरे यांनी सांगितले. स्वागत यात्रेत नाशिक येथील महामंडलेश्वर महंत सुधीरदास महाराज, ठाणे पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे सहभागी होणार आहेत. याशिवाय विविध चित्रमालिकेतील कलाकारांचा सहभाग स्वागत यात्रेत असणार आहे.७ मार्च रोजी सकाळी ८ वाजता अठराशे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत देवदेशोपासना, सामुदायिक वंदेमातरम होईल. यावेळी ओंकार शाळेच्या संस्थापिका दर्शना सामंत उपस्थित राहणार आहेत. १५ मार्च रोजी सकाळी ७ वाजता अथर्वशीर्षपठण, त्यानंतर दिवसभर मुलांच्या गायन, वादन, नृत्य स्पर्धा, दुचाकी रॅली, १७ मार्च रोजी गणेश मंदिरात दीपोत्सव, श्रीसूक्त पठण. १७ मार्च रोजी रांगोळी प्रदर्शन, १६ मार्च रोजी २२ मंदिरांमध्ये एकावेळी सामुहिक उपासना, १८ मार्च रोजी भागशाळा मैदानात संध्याकाळी साडे पाच वाजता छत्रपती संभाजी महाराज बलिदान दिन, संपूर्ण वंदेमातरम आणि विविध लोककलेचे कार्यक्रम, १९ मार्च रोजी सकाळी ५ वाजता महापौर ॲड. हर्षाली चौधरी यांच्या उपस्थितीत श्री गणेश महापूजा. त्यानंतर भागशाळा मैदान येथून सकाळी सात वाजता स्वागत यात्रेला प्रारंभ होणार आहे.

# थोडक्यात

## पेण आर.टी.ओ कार्यालय परिसरात श्री सदस्यांची स्वछता मोहीम



**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.०८, पेण (रायगड) :** थोर समाजसुधारक डॉ. नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंती निमित्त पेण व पनवेल तालुक्यातील श्री सदस्यांनी रविवार, दिनांक ०८ मार्च २०२६ रोजी पेण आर.टी.ओ कार्यालय परिसरात स्वच्छता मोहीम राबवली. यामध्ये सुमारे ४ ते ५ टन सुकलेले गवत व इतर कचरा गोळा करण्यात आला. या स्वच्छता मोहिमेत पेण व पनवेल तालुक्यातील ११२५ श्री सदस्य सामील झाले होते. थोर निरूपणकार डॉ.नानासाहेब धर्माधिकारी यांच्या जयंती निमित्त मागील रविवारी संपूर्ण देशात स्वच्छता अभियान राबविण्यात आले होते. याच स्वच्छता अभियानाच्या निमित्ताने आज रविवारी पेण तालुक्यातील जिते गावात असेलेल्या रायगड जिल्हा आर टी ओ कार्यालयाच्या सुमारे १० एकर परिसरात स्वच्छता अभियान राबविण्यात आले. पेण येथील या उप प्रादेशिक कार्यालयाच्या आवारात २०१८ साली डॉ.नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या वतीने १ हजार ४०० विविध जातींच्या वृक्षाची लागवड करण्यात आली होती. आज ही झाडे मोठी झाली आहेत. आज करण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमे अंतर्गत आकस्मिक लागणारे वनवा लागून झाडांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी या परिसरात वाळलेले गवत काढण्यात आले. यावेळी ११२५ श्री सदस्य उपस्थित होते. या स्वच्छता अभियानात पेण उप प्रादेशिक कार्यालयातील मोटार वाहन निरीक्षक दिग्विजय कोळी व कार्यालयीन अधीक्षक मंगेश नाईक उपस्थित होते.

## ऐरोली माध्यमिक विद्यालय सलग अकरा वेळा इन्स्पायर अवॉर्ड ने सन्मानित




**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.०८, ऐरोली (नवी मुंबई) :** भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे संपूर्ण देशभरात इयत्ता सहावी ते बारावीच्या विद्यार्थ्यांकरीता इन्स्पायर अवॉर्ड ही स्पर्धा राबवली जाते. यामध्ये विद्यार्थ्यांनी आपले प्रकल्प ऑनलाईन भरायचे असतात त्यातून निवडक विद्यार्थ्यांच्या प्रकल्पाला १० हजार रुपयांचे पारितोषक व प्रमाणपत्र देण्यात येते. यावर्षी ऐरोली माध्यमिक विद्यालयातील इयत्ता आठवी मध्ये शिकणारा कु.रुद्र विकास साळुंखे व इयत्ता दहावी मध्ये शिकणारी कुमारी वैष्णवी बाबू सुर्यवंशी या दोन विद्यार्थ्यांनी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाचा जिल्हास्तरीय इन्स्पायर अवॉर्ड पुरस्कार प्राप्त केला आहे. ऐरोली माध्यमिक विद्यालयाचा इन्स्पायर अवॉर्डमध्ये हा अकरावा पुरस्कार आहे. या यशाबद्दल सहभागी विद्यार्थ्यांचे ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुरेश संकपाळ, उपाध्यक्षा गौरी मोकाशी, सचिव तुकाराम नांदुगडे, खजिनदार प्रशांत संकपाळ, संचालक यादव, सौरभ संकपाळ, संचालिका वैशाली संकपाळ तसेच ऐरोली माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शंकर देसाई, पर्यवेक्षक साळुंखे व जाधव या मान्यवरांनी अभिनंदन केले. या प्रकल्पास मार्गदर्शन करणारे विज्ञान शिक्षक युवराज सोळसकर, भुयार, वाघलोडा, शिरसाट, साळुंखे, धादवड यांचेही अभिनंदन व कौतुक करण्यात आले.

## जागतिक महिला दिनानिमित्त विविध क्षेत्रातील महिलांचा सन्मान



**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०८, सोलापूर :** जागतिक महिला दिनानिमित्त ब्रम्हाकुमारी संस्थेच्या दिव्य दीप सरोवर, सोलापूर सबझोन येथे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान सोहळा उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात सोलापूरच्या उपमहापौरज्ञानेश्वरी देवकर यांच्या हस्ते मान्यवर महिलांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाचे आयोजन ब्रम्हाकुमारी सोलापूर सबझोन इंचार्ज बी.के.सोमप्रभा दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी समाजातील विविध क्षेत्रात कामगिरी करणाऱ्या महिलांचा गौरव करण्यात आला. सन्मानित महिलांमध्ये डॉक्टर वैशाली मालू, डॉक्टर फरीदा, मुख्याध्यापक प्रतिमा कंदी, शिक्षक मंडळ अधिकारी कुंदा राजगुरू, शिक्षक अलका मलगुंडा तसेच ब्रह्माकुमारी संस्थेच्या बी.के.सोमप्रभा दीदी, महादेवी बहनजी (परांडा), बी.के.सदीक्षा दीदी आणि बी.के.सुजाता दीदी यांचा समावेश होता. प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर यांनी आपल्या मनोगतात ब्रम्हाकुमारी संस्था महिलांना सन्मान देणारी आणि त्यांना नेतृत्वाची संधी देणारी संस्था असल्याचे सांगितले. महिलांच्या नेतृत्वातून चालणारी ही संस्था समाजात सकारात्मक संस्कार आणि अध्यात्मिक मूल्ये रुजवण्याचे कार्य करत असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिक्षण विभागातील कुंदा राजगुरू या होत्या. त्यांनी महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करत समाजात महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असल्याचे सांगितले. यावेळी बी.के.सदीक्षा दीदी यांनी ब्रह्माकुमारी संस्थेच्या विविध सामाजिक व आध्यात्मिक उपक्रमांची माहिती दिली, तर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन बी.के.सुजाता दीदी यांनी केले. महिला दिन आणि रंगपंचमी एकाच दिवशी आल्याने सन्मान सोहळ्यानंतर उपस्थित महिलांनी नैसर्गिक रंगांनी रंगपंचमी खेळून आनंद साजरा केला. या आनंदमयी वातावरणामुळे कार्यक्रम अधिकच संस्मरणीय ठरला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बी.के.अमर भाई पुजारी, ओंकार भाई, आदित्य भाई, बाळू भाई, गणेश भाई, फरिषता भाई, रेवनसिद्ध भाई तसेच संस्थेच्या माताजी व भाई यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## २०२६-२७ हे 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरे करणार

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०८, नवी मुंबई :** महात्मा ज्योतिबा फुले यांची २०० वी जयंती ११ एप्रिल २०२६ यावर्षी आहे. त्यासाठी एक समिती स्थापन करुन विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात येईल, त्यासाठी निधी देणार असून महात्मा फुले यांचे जन्मगाव मौजे कटगुण, जिल्हा सातारा येथे भव्य स्मारक उभारणार आहे. त्याचप्रमाणे संत गाडगेबाबा यांच्या १५० व्या जयंतीवर्षानिमित्त त्यांचे जन्मस्थळ, कर्मभूमी, अंतिम श्रद्धास्थान यांना एकत्रित करुन संत गाडगेबाबा तीर्थक्षेत्र सर्किट विकसित करण्यात येणार आहे. राज्यस्तरीय अभियाने एकत्र करुन संत गाडगेबाबा ग्राम समृद्धी अभियान राबविण्यात येणार आहे. ७५ गावांत 'एआय'च्या सहाय्याने नागरिकांचे जीवनमान उंचावण्यासाठी पथदर्शी प्रकल्प राबविणार असून महात्मा फुले, संत गाडगेबाबा आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मृतिंचे विशेष वर्ष म्हणून २९२६-२७ हे 'सामाजिक समता आणि समरसता वर्ष' म्हणून साजरे करणार असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.